REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2022

# भारतीय संविधान निर्मितीची वाटचाल...

डॉ. सचिन गौतम इंगळे[1] , डॉ. पुष्पांजली सचिन इंगळे[2]
[1]सहाय्यक प्राध्यापक, एस.एस.ए. कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर.
[2]सहाय्यक प्राध्यापक (एम.एड.विभाग) कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर.




जेव्हा आपण संविधान म्हणतो त्यावेळेस आपल्या सर्वांना एक बाब लक्षात आली पाहिजे संविधान म्हणजे काय? Contitution ये लॅटिन शब्दापासून constitution हा इंग्रजी शब्द तयार झालेला आहे. ज्याचा अर्थ असा होतो की, शासन करण्याचा सिद्धांत.

किंवा आपण असेही म्हणू शकतो, एखाद्या देशाचे शासन ज्या नियम व सिद्धांतानुसार चालते त्या नियम व सिद्धांताच्या समूहास संविधान असे म्हणतात.

हाच विचार भारतीय संविधान सभा निर्मित करून लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे देश व देशातील नागरिकांचे कल्याण करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला अंतिम कायदा आहे.

संविधान निर्मितीच्या वाटचालीचा ऐतिहासिक आढावा घेत असताना काही महत्वपूर्ण घटना आपल्याला इथे निश्चितच मांडाव्या लागतील जसे की,

10 ऑगस्ट 1928 मध्ये नेहरू रिपोर्ट हा भारतीयांच्या द्वारे आपल्या देशासाठी संविधान तयार करण्याचा पहिला प्रयत्न होता.

1940 मध्ये एक अत्यंत महत्वपूर्ण घटना घडली ती म्हणजे ऑगस्ट ऑफर हा दस्तावेज सादर केला, ज्यामध्ये भारताची घटना मुख्यतः भारतीयांनी तयार करावी हे तत्व ब्रिटिश शासनाद्वारे मान्य करण्यात आले. आणि शेवटी 1942 च्या तरतुदीने भारतीय घटना पूर्णतः भारतीय ने तयार करावी हे तत्व ब्रिटिशांनी मान्यच केले आणि त्याच्या पुढील प्रक्रियासाठी 24 मार्च 1946 ला भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेसाठी तीन व्यक्तींचे एक कॅबिनेट मिशन भारतामध्ये आले व त्यांनी विविध भारतातील नामवंत व्यक्तींची मते जाणून घेतली आणि 16 मे 1946 पब्लिक प्लॅन मांडला आणि तोच पब्लिक प्लॅन 26 मे 1946 रोजी ब्रिटिश पार्लमेंटने त्याला संमती दर्शवली.

भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये कॅबिनेट मिशन प्लॅन हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचे कारण असे आहे की, कॅबिनेट मिशन त्यानुसार जो पब्लिक प्लॅन तयार करण्यात आलेला होता त्याद्वारे त्यांनी भारतीय संविधान तयार करण्याची संविधान सभा सदस्य संख्या 389 ही निश्चित केली होती. त्यामध्ये प्रतिनिधी निवडी बाबतचे दोन गट

त्यांनी मांडले होते. 296 ब्रिटिश प्रांतांसाठीचे प्रतिनिधी आणि 93 संस्थानिकाचे प्रतिनिधी अशी भारतीय संविधान सभा सदस्य संख्या निश्चित करण्यात आलेली होती.

ही संविधान सभा सदस्य संख्या निश्चित करण्यासाठी आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे की, 1935 च्या कायद्यानुसार नुकत्याच स्थापन झालेल्या प्रांतिक कायदेमंडळाच्या सदस्यांकडून दहा लाख लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी या तत्त्वाचा विचार करून अप्रत्यक्षपणे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्रमणीय मताद्वारे 11 ब्रिटिश गव्हर्नर प्रांतातील व चार चीफ कमिशनर प्रांत यांची मिळून एकत्रित 296 सदस्य संख्या निश्चित करण्यात आले होते.

परंतु तत्कालीन 93 संस्थानिक या संविधान निर्मितीच्या संख्येवरून नाराज झाले.

तत्कालीन परिस्थितीमध्ये ब्रिटिशांच्या द्वारे भारतीय राजकारणासंबंधी व भविष्य निश्चितीबाबत अत्यंत वेगाने घडामोडी घडत होत्या आणि विविध प्रकारच्या घटनाही घडत होत्या त्याचाही या ठिकाणी विचार करणे गरजेचे आहे. भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये संविधान सभेच्या अधिवेशन कार्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे याच अधिवेशनांच्या कार्यातून भारतीय संविधान उदयास आले आहे. तोच क्षण म्हणजे;

9 डिसेंबर 1946 रोजी सकाळी ठीक 11. वाजता मुंबई येथील सेंट्रल हॉल ते पुढे जाऊन संविधान सभागृह म्हणून ओळखले जाऊ लागले याच ठिकाणी भारतीय संविधान निर्मितीचे पहिले अधिवेशन भरले या अधिवेशनाला 211 प्रतिनिधी उपस्थित होते मात्र मुस्लिम लीगचे 73 प्रतिनिधी गैरहजर होते. मुस्लिम लीगच्या प्रतिनिधी हजर नाहीत म्हणून मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींनी संविधान सभेच्या कार्यास हजर राहावे हा विचार घेऊन पहिल्या दिवसाचे संविधान निर्मिती सभेचे कामकाज थांबविण्यात आले.

आणि भारतीय संविधान निर्मिती पहिल्या अधिवेशन च्या दुसऱ्या दिवशी Rule of procedure म्हणजे संविधान सभेची पहिली प्रक्रिया नियम समिती करण्यात आली.

पुढे 11 डिसेंबर 1946 हा दिवस भारतीय संविधान निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामध्ये संविधान समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद व उपाध्यक्ष म्हणून एच. सी. मुखर्जी तसेच घटनात्मक सल्लागार म्हणून थोर विधीतज्ज्ञ सर बी. एन. राव यांची निवड करण्यात आली. याच अधिवेशनात 13 डिसेंबर रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय संविधानाबाबत Objective Resolution म्हणजेच उद्देशपत्रिका मांडली व प्रत्यक्ष संविधान निर्मितीच्या कामकाजाला सुरुवात झाली.

भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेसाठी एकूण 11 अधिवेशने पार पडली. त्यातील आपण काही महत्त्वपूर्ण अधिवेशनाचा येथे उल्लेख करू दुसऱ्या अधिवेशनामध्ये 22 जानेवारी 1947 रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी पूर्वी मांडलेला उद्देशपत्रिकेचा ठराव म्हणजे उद्दिष्टाचा ठराव संमत करण्यात आला. याच कालावधी दरम्यान भारत देशासाठी आणि पाकिस्तान या देशासाठी स्वतंत्र राष्ट्र मान्यता देणारी एक घटना संविधान सभेच्या तिसऱ्या अधिवेशनादरम्यान घडली ती अशी की, 3 जून 1947 रोजी माउंटबॅटन योजना जाहीर झाली. याच माउंटबॅटन योजने आधारित भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947 हा 5 जुलै 1947 रोजी ब्रिटिश पार्लमेंट मध्ये संमत करण्यात आला आणि 18 जुलै रोजी ब्रिटिश राजशक्तीची त्याला मान्यता मिळाली. त्यामुळे संविधान सभेची सदस्य संख्या पुनर्रचित झाली ती अशी की ब्रिटिश प्रांताची 296 असलेली सदस्य संख्या 229 झाली. आणि संस्थानिक प्रतिनिधींसाठी 93 संख्येवरून 70 झाली.

अंतिमतः भारतीय संविधान निर्मितीच्या सभेमध्ये 299 सदस्य निश्चित झाले. यामध्ये आणखी एक घटना घडली ती म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सदस्यत्व भारत आणि पाकिस्तान यांची फाळणी झाल्यामुळे पुनर्निर्वाचित करण्यात आले. कारण का ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सुरुवातीस ते पूर्व बंगाल विधानमंडळातून श्री जोगेंद्रनाथ मंडळ आणि इतर अनुसूचित जातींच्या सदस्यांच्या पाठिंब्यावर भारतीय संविधान निर्मिती सभेत प्रवेश

मिळवला होता. हा प्रदेश पाकिस्तान मध्ये गेल्या कारणाने त्यांच्या सदस्यपदास अडचण निर्माण झाली आणि ते पुन्हा मुंबई प्रांतातील डॉ. जयकर यांच्या राजीनाम्यामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली.

भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेमधील पाचवे अधिवेशन हे अत्यंत महत्त्वाचे आहे ते या कारणे 14 ऑगस्ट 1947 च्या ठरावाने भारतीय संविधान सभेस सार्वभौमत्व प्राप्त झाले आणि माऊंटबॅटन हे स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल व पंडित जवाहरलाल नेहरू यांची पंतप्रधान पदी नियुक्ती करण्यात आली.

29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली 7 सदस्यांची Drafting Committee म्हणजे मसुदा समितीची स्थापना करण्यात आली आणि भारतीय घटना प्रत्यक्ष लिहिण्यास सुरुवात झाली.

संविधान निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये भारतीय स्वातंत्र्याचा कायद्याद्वारे 1947 तीन मुख्य प्रभाव पडले.

1. संविधान सभा पूर्णतः सार्वभौम अशी संस्था बनली थोडक्यात तिला आपल्या मर्जीने घटना तयार करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
2. एक सभा दोन कार्य करत असे, म्हणजे ती संविधान निर्मिती सभा झाली व विधिमंडळात्मक संस्था ही झाली म्हणजे देशासाठी घटना तयार करणे घटना तयार करत असताना अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी कामकाज पहावे आणि देशासाठी कायदे करणे कायदे करताना अध्यक्ष म्हणून ग.वा. माळवणकर यांनी कामकाज पाहतील असे निश्चित करण्यात आले.
3. याच कायद्याने सदस्य संख्या 389 वरून 299

भारतीय संविधान निर्मितीच्या सहाव्या अधिवेशन नंतर 8 फेब्रुवारी 1948 पहिला भारतीय संविधानाचा मसुदा प्रकाशित केला. 26 फेब्रुवारी 1948 पासून तो लोकमत अजमावण्यासाठी तब्बल 8 महिने ठेवण्यात आला. ऑक्टोंबर 1948 मध्ये दुसरा मसुदा तयार करण्यात येऊन 24 ऑक्टोंबर रोजी घटना समितीच्या अध्यक्षांना तो सादर केला. 4 नोव्हेंबर 1948 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेचा अंतिम मसुदा घटना समितीसमोर सादर केला.यावरून घटनेच्या मसुद्याचे 3 वाचणे व त्यावर चर्चा झाली.

पहिले वाचन 4 ते 9 नोव्हेंबर 1948 मध्ये झाले.

दुसरे वाचन 15 नोव्हेंबर 19 48 ते 17 ऑक्टोबर 1949. यावेळी खूप मोठ्या घडामोडी घडल्या म्हणजे की, लोकांची मते त्यांनी सुचवलेल्या दुरुस्त्या, अपेक्षा सदस्यांनी दिलेली मते,विविध तज्ञांनी मांडलेले विचार व अशा अनेक सूचना दुसऱ्या वाचनाच्या वेळी आल्या या सूचनेची व दुरुस्ती संख्या 7653 सुचविण्यात आल्या.

यातील सर्व सूचनांचा विचार करून एकत्रितपणे 2473 सूचना व दुरुस्त्या यांच्यावर प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली व आवश्यक तेथे भारतीय संविधानाच्यामसुद्यामध्ये बदल करण्यात आला.

तिसरी वाचन 14 ते 26 नोव्हेंबर 1949 रोजी करण्यात आले. या वाचनाची प्रक्रिया ही भारतीय संविधान निर्मितीच्या आठ नऊ दहा आणि अकरा या अधिवेशनादरम्यान झाली व भारतीय संविधानास अंतिम स्वरूप देण्याचे या अधिवेशनामध्ये बहुमूल्य असे कार्य करण्यात आले. शेवटी भारतीय व भारताच्या आधुनिक इतिहासातील तो सुवर्ण दिवस उगवला 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान समितीने भारताचे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण केले ; त्याच्यावर अध्यक्ष म्हणून राजेंद्र प्रसाद यांची स्वाक्षरी झाली आणि या नंतर भारतीय संविधानवर 299 पैकी 284 उपस्थित असलेल्या सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. म्हणून याच दिवसाला आपण सर्व भारतीय

26 नोव्हेंबर भारतीय संविधान दिन असे संबोधतो. त्याला आपण असेही म्हणू शकतो की, संविधान स्वीकृती दिवस. पुढे भारतीय संविधान स्वीकृतीमुळे खूप महत्त्वपूर्ण घटना घडल्या त्यात 24 जानेवारी 1950 ला संविधान सभेची विशेष बैठक संपन्न झाली. यामध्ये 3 बाबींचा विचार करण्यात आला.

भारताचे राष्ट्रगीत म्हणून जनगणमन वंदे मातरम राष्ट्रगान म्हणून स्वीकृत करण्यात आले.संविधान सभेत निवडणुका होईपर्यंत तात्पुरती हंगामी संसद म्हणून घोषित करण्यात आले. निवडणुका होईपर्यंत पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ.राजेंद्र प्रसाद यांची नेमणूक करण्यात आली. सरते शेवटी 25 जानेवारी 1950 रोजी भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. 26 जानेवारी 1950 पासून भारतीय संविधान अंमलबजावणीत आले त्यालाच आपण 26 जानेवारी प्रजासत्ताक / गणतंत्र दिवस म्हणून ओळखतो. भारतीय संविधानात सुरुवातीस 22 भाग 395 कलमे व 8 अनुसूची होत्या. शेवटी या भारतीय संविधानाचा उदात्त हेतू हा निश्चित करण्यात आला की, भारतात लोकशाही पद्धतीने कायद्यावर आधारलेले राज्य साकार करणे.

**आपण थोडक्यामध्ये भारतीय संविधाना मध्ये समाविष्ट करण्यात आलेले मूळ 22 भाग व 12 परिशिष्टे पाहू.**

- भाग एक संघराज्य व त्याचे क्षेत्र कलम 1 ते 4 मध्ये मांडले आहे.
- भाग दोन नागरिकत्व कलम 5 ते 11 मध्ये मांडले आहे.
- भाग तीन मूलभूत हक्क कलम क्रमांक 12 ते 35 मध्ये मांडले आहेत.
- भाग चार राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे कलम 36 ते 51 मध्ये मांडली आहेत.
- भाग चार क मूलभूत कर्तव्य कलम 51 क मांडलेला आहे
- भाग पाच संघराज्य कलम क्रमांक 52 ते 151 मांडलेला आहे
- भाग सहा घटक राज्य कलम क्रमांक 152 ते 237 मांडलेला आहे
- भाग सात हा निरसित करण्यात आलेला आहे कलम 238
- भाग आठ संघराज्य प्रदेश म्हणजेच केंद्रशासित प्रदेश कलम 239 ते 242 मांडलेला आहे
- भाग नऊ पंचायत राज कलम 243 मध्ये मांडलेले आहे.
- भाग नऊ क नगरपालिका 243 मध्ये मांडलेले आहे.
- भाग नऊ ख सहकारी संस्था 243 मध्ये मांडले आहेत.
- भाग दहा अनुसूचित क्षेत्र व जनजाती क्षेत्र कलम 244 मध्ये मांडले आहे.
- भाग अकरा केंद्र-राज्य संबंध कलम क्रमांक 245 ते 263 मध्ये मांडले आहे.
- भाग बारा वित्त व्यवस्था, मालमत्ता संविदा हक्क, दायित्व प्रतिदायित्व कलम क्रमांक 264 ते 300 क मध्ये मांडलेले आहे.
- भाग तेरा भारताच्या राज्यक्षेत्रातील व्यापार वाणिज्य व व्यवहार संबंध कलम क्रमांक 301 ते 307
- भाग चौदा संघराज्य व घटक राज्य यांच्या अधिपत्याखालील सेवा कलम क्रमांक 308 ते 323 मध्ये मांडलेले आहे.
- भाग  चौदा क न्यायाधीकरणे 323 क 323 ख मध्ये मांडला आहे.
- भाग पंधरा निवडणुका व निवडणूक आयोग कलम क्रमांक 324 ते 329 क मध्ये मांडला आहे.
- भाग सोहळा विवक्षित वर्गासंबंधी विशेष तरतुदी म्हणजे (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अंगलो इंडियन राखीव जागा) कलम क्रमांक 330 ते 342 मध्ये मांडण्यात आलेला आहे.

- भाग सतरा राजभाषा कलम 343 ते 351 मध्ये मांडल्या आहेत.
- भाग अठरा आणीबाणी विषयक तरतुदी कलम क्रमांक 352 ते 360 मध्ये मांडण्यात आली आहे.
- भाग एकोनीस संकीर्ण ( राष्ट्रपती राज्यपाल यांना संरक्षण मोठी बंदरे विमानतळे यांच्या तरतुदी ) कलम क्रमांक 361 ते 367
- भाग वीस घटना दुरुस्ती कलम 368 मध्ये मांडली आहे.
- भाग एकवीस अस्थाई संक्रमणी व विशेष तरतुदी जम्मू काश्मीर विशेष दर्जा वैधानिक विकास महामंडळे कलम क्रमांक 369 ते 392 मध्ये मांडण्यात आले आहे.
- भाग बाविसा संविधानाचे संक्षिप्त नाव ( हिंदी अनुवाद निरसने) कलम 343 ते 395.

**याच नुसार भारतीय राज्यघटनेमध्ये 12 परिशिष्टे म्हणजे अनुसूची यांची मांडणी करण्यात आलेली आहे ती याप्रमाणे.**

- परिशिष्ट क्रमांक एक राज्य व केंद्रशासित प्रदेश
- परिशिष्ट क्रमांक दोन वेतन भत्ते व विशेष अधिकार
- परिशिष्ट क्रमांक तीन शपथाचे नमुने
- परिशिष्ट क्रमांक चार राज्यसभेत राज्यांचे सदस्यत्व
- परिशिष्ट क्रमांक पाच अनुसूचित जाती जमाती बाबत तरतुदी
- परिशिष्ट क्रमांक सहा आसाम मेघालय त्रिपुरा मिझोराम मधील जनजाती
- परिशिष्ट क्रमांक सात केंद्र सूची राज्य सूची समवर्ती सूची
- परिशिष्ट क्रमांक आठ भारतीय भाषा
- परिशिष्ट क्रमांक नऊ विवक्षित अधिनियम व विनियम
- परिशिष्ट क्रमांक दहा पक्षांतर बंदी
- परिशिष्ट क्रमांक अकरा पंचायत राज
- परिशिष्ट क्रमांक बारा नगरपालिका.

अशा पद्धतीने भारतीय संविधान निर्मितीची वाटचाल झाली आणि भारतीय संविधानामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक कलमांचा भारतीय गरज परिस्थिती यांना पाहून संविधान सभेद्वारे सविस्तर चर्चा होऊन व करून समावेश करण्यात आला आहे.

भारतीय लोकशाहीची सर्वार्थाने स्वीकृती ही भारतीय संविधानामुळेच झाली आहे. असे आपण या ठिकाणी म्हणू शकतो. शेवटी एक भारतीय म्हणून आपली जी ओळख निर्माण झाली आहे ती फक्त आणि फक्त या भारतीय संविधानाच्या मुळेच म्हणून म्हणावेसे वाटते...

जय भारतीय संविधान...सर्वांना 26 नोव्हेंबर भारतीय संविधान दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा..

## संदर्भसूची.


1) डी.डी. बसू 2012,भारतीय संविधान.
2) एम. लक्ष्मीकांत 2014, भारतीय संविधान व प्रशासन
3) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक, इयत्ता अकरावी व बारावी.